दैनिक
# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १६७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.३० जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## अवकाळी पावसामुळे बाधित ७ लाख शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी मंजूर-मंत्री मकरंद जाधव

मुंबई दि. २९ (प्रतिनिधी)- राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने ७ लाख ९ हजार शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी रुपयांची मदत मंजूर केली असून, ही रक्कम डीबीटी पद्धतीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सतेज पाटील, सदाभाऊ खोत, शिवाजीराव गर्जे, प्रज्ञा सातव, विवेक कोल्हे, अंबादास दानवे यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले, ज्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी उपलब्ध आहेत, त्यांच्या खात्यात मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या खात्यातही मदत जमा केली जाईल. काही शेतकरी किंवा पशुपालकांना अद्याप मदत मिळाली नसल्यास संबंधित तक्रारी शासनाकडे सादर कराव्यात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने सूचना देऊन पात्र लाभार्थ्यांना मदत मिळवून दिली जाईल. खरीप हंगामात पीक व शेतीच्या नुकसानीसाठी १ कोटी ५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ८ हजार २३६ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. तसेच रब्बी हंगामासाठी जाहीर करण्यात आलेल्या मदतीचे वितरणही सुरू असून, ई-केवायसी किंवा बँक खात्यांतील तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असलेली रक्कम लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, असे मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी स्पष्ट केले.

# भीमराव कांबळेला मरेपर्यंत फाशीची शिक्षा

## नसरापूर अत्याचार प्रकरण : दोन महिन्याच्या आत फास्ट ट्रॅक कोर्टाचा निकाल



पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणारा आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी सोमवारी फाशीची शिक्षा सुनावली. कांबळे याला विशेष न्यायालयाने गुरुवारी (२५ जून) दोषी ठरवून निकाल राखून ठेवला होता.

महाराष्ट्रदिनी १ मे रोजी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला होता. या खटल्यात सरकार आणि बचाव पक्षाकडून अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला. न्यायालयात सरकार पक्ष, बचाव पक्ष; तसेच बालिकेच्या कुटुंबीयांच्या वतीने बाजू मांडण्यात आली होती. त्यानंतर गुरुवारी (२५ जून) कांबळे याला दोषी ठरवून आरोपपत्रात नमूद करण्यात आलेल्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती दिली होती. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली.

या खटल्यात २० जूनला अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी (२५) सरकार पक्ष, बचाव पक्ष आणि मूळ फिर्यादी यांनी आपली बाजू मांडली. या वेळी कांबळेला हजर करण्यात आले होते. तुझ्या विरोधात दोषारोपपत्रात नमूद असलेले सर्व आरोप सिद्ध झाले आहेत. तसेच दोषारोपपत्रात नमूद असलेल्या कोणत्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती न्यायालयाने आरोपीस दिली. 'हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मीळ' आहे. आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा देण्यात यावी, आरोपी कांबळे याने केलेले कृत्य घृणास्पद, क्रूर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा द्यावी. महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. कायदे अस्तित्वात असताना अशा प्रकारचे गुन्हे घडतात. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या (पान ४ वर)

### मी फास्ट ट्रॅक न्यायालयाचे विशेष आभार मानतो-मुख्यमंत्री

२५ जून रोजी आरोपीला दोषी ठरवण्यात आलं. घटना घडल्यानंतर ५५ व्या दिवशी न्यायालयाने त्याला दोषी ठरवलं. त्यानंतर २९ जून म्हणजे आज आरोपीला तिहेरी फाशीची शिक्षा न्यायालयाने दिली आहे. केवळ २९ दिवसांमध्ये ५५ साक्षीदार तपासून ही शिक्षा आरोपीला झाली आहे. मी फास्ट ट्रॅक न्यायालयाचे विशेष आभार मानतो. कारण चार्जशीट दाखल करेपर्यंत टाइमलाइन पोलिसांच्या हातात असते. त्यानंतर ती न्यायालयाच्या हातात असते. न्यायमूर्ती एस. आर. साळुंखे यांनी त्यांच्या सुट्ट्याही रद्द केल्या आणि सुनावणी सातत्याने घेतली. अशा प्रकारच्या नराधमांवर कारवाई करायची असेल आणि जरब बसवायचा असेल तर वेळेत न्याय मिळणं आवश्यक आहे. न्यायालयाने आता नवीन उदाहरण आपल्यापुढे मांडलं आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल आणि सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो कारण त्यांनी योग्य पद्धतीने पुरावे गोळा केले. फाशी देण्यासाठी कुठलाही संशय मागे राहता कामा नये ही तरतूद असते. पोलिसांनी जे पुरावे सादर केले त्यामुळे आपण ही फाशीची शिक्षा देऊ शकलो. अशा घटना घडू नये हीच आपली इच्छा आहे. पण दुर्दैवाने समाजात ज्या प्रवृत्ती आहेत त्या डोकं वर काढतात. अशा नराधमांना ५९ दिवसांता फाशीपर्यंत पोहचवता येतं हे या प्रकरणात आपल्याला पाहण्यास मिळालं. छोटीशी मुलगी होती पण तिच्या पालकांचं दुःख कमी करु शकत नाही पण त्यांना समाधान असेल की आरोपीला तिहेरी फाशीची शिक्षा न्यायलायने सुनावली आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

### पीडित चिमुकलीच्या आई-वडिलांना अश्रू अनावर

नसरापूर प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षी सुनावताच पीडित मुलीचे आई-वडिलांना अश्रू अनावर झाले. न्यायालयातून बाहेर आल्यानंतर पीडित मुलीच्या वडिलांनी सदर निकालावर प्रतिक्रिया दिली. सरकारकडून आम्हाला ज्या अपेक्षा होत्या त्याबद्दल आम्ही समाधान व्यक्त करतो. पोलीस आणि वकिलांचे मी आभार मानतो. मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिलं ते पूर्ण होताना दिसतंय. सगळ्यांनी कायद्यावर विश्वास ठेवावा, असं नसरापूर प्रकरणातील पीडित चिमुकलीच्या वडिलांनी सांगितलं. तसेच आरोपीचं वय असं आहे की त्याने हे सगळं करणं लज्जास्पद आहे, असंही पीडित मुलीचे वडील म्हणाले.

## पीक विमा, कृषी समृद्धी योजनेचा निधी अन् शेतकऱ्यांना तुटपुंजे अनुदान; मुनगंटीवारांचा सरकारला घरचा आहेर



मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्याच्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून सुरू आहे. या अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा होत असून वेगवेगळ्या मुद्यांवरून अनेकदा सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याचंही पाहायला मिळालं आहे. या पार्श्वभूमीवर आज (२९ जून) विधानसभेत पुरवणी मागण्यांच्या संदर्भातील विषयांबाबत बोलताना भारतीय जनता पक्षाचे नेते तथा आमदार सुधीर मुनगंटीवार हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले आहेत.

शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा प्रश्न, कृषी समृद्धी योजनेला मिळणारा तुटपुंजा निधी आणि शेतकऱ्यांना मिळणारे तुटपुंजे अनुदान अशा विविध मुद्यांवरून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्य सरकारला घराचा आहेर देत अनेक सवाल विचारले आहेत. मागच्या वर्षी कृषी समृद्धी योजनेला एक फुटकी कवडी दिली नाही, या वर्षी फक्त २ हजार कोटी दिलेत. त्यामुळे ज्याचं अन्न खाता, त्याच्याशी तरी किमान खोटं बोलू नका, असं म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला धारेवर धरलं आहे.

पुरवणी मागण्याच्या विषयावर बोलताना सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं की, "आपल्याकडे राजव्यवस्थेच्या जे पाच प्रकार आहेत, लोकशाही, राजेशाही, हुकूमशाही, साम्यवाद आणि समाजवाद अशा पाच अवस्थेतून राज्य चालवण्याच्या पद्धती विकसित होतात. यामध्ये मला एक पद्धत जोडण्याची आवश्यकता असल्याचं जाणवतं. लोकशाही ही नावापुरती आहे आणि लोकशाही ही आता हेवी झाल्याचं जाणवतं. कारण पुरवणी मागण्यातील कृषी विभागाच्या विषयात अपेक्षा अशी होती की, आमचे कृषीमंत्री अतिशय पोटतिडकीने त्यांच्या भाषणात शेतकऱ्यांच्या समस्या आणि वेदना मांडत होते. त्याबाबत मी त्यांचं मनापासून कौतुक करतो. पण जेव्हा पुरवणी मागण्या समोर आल्या, तेव्हा माझ्या लक्षात आलं की, मंत्र्यांच्या मनात काम करण्याची इच्छा आहे. म्हणजे कसं की गाडी नवीन घ्यायची आणि त्या गाडीत पेट्रोल टाकायचं नाही. फक्त चांगला चालक द्यायचा. मग ती गाडी त्या चालकाच्या फक्त आश्वासनावर, भाषणावर आणि भाषणातील शब्दांवर चालणार आहे का?", असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं.

"आपण शेतकऱ्यांना पीक विम्याच्या संदर्भात काय शब्द दिला होता? आपण एक रुपयांमध्ये पीक विमा देतो आणि त्यावर मोठमोठे फ्लेक्स लावतो. तेव्हा माझ्या लक्षात आलं की त्या पीक विम्याच्या फ्लेक्सवर आपण जो खर्च करतो, त्यापेक्षा आपण तो खर्च पायाभूत सुविधांवर खर्च केला, तर तो जास्त योग्य आहे. कारण आरोग्य बिघडल्यानंतर औषधांवर खर्च करण्याऐवजी आरोग्य बिघडू नये म्हणून जीममध्ये जाण्यासाठी खर्च केला तर आरोग्य बिघडत नाही. या भावनेने आपण कृषी समृद्धी योजना आणली होती", असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे.

## सिया अन् चेतनला ५ दिवसांची पोलीस कोठडी

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्टाला हादरवून सोडणाऱ्या लोहगड केतन अग्रवाल मृत्यूप्रकरणी त्याची भावी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन यास पोलिसांनी अटक केली असून त्यांना देण्यात आलेली पोलीस कोठडी आज संपत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आरोपी सिया आणि चेतनला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. याप्रकरणी, आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात बाजू मांडताना तपास पूर्ण झाल्याने अधिकच्या पोलीस कोठडीची गरज नसल्याचे म्हटले. तर, केतन अग्रवाल कुटुंबीयांच्यावतीने आणि सरकारी वकिलांनी तपासातील काही बाबी शिल्लक असल्याचा युक्तिवाद करत पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी केली होती. त्यानुसार, दोन्ही आरोपींना ३ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपींनी कट रचला असल्याचं निष्पन्न झालं आहे, मात्र गुन्हा कसा केला याचा तपास करायचा आहे. कट कुठं बसून केला हे तपासायचे आहे. सियाप्रमाणे चेतनला घेऊन रिक्रियेशन करायचं आहे. लोहगडावर अनेकांशी संवाद साधला आहे, बालीला प्री वेडिंग शूटला जायचं नव्हतं म्हणून, पासपोर्ट फाडले, तो केतनचा पासपोर्ट शोधायचे आहे. लोहगडावर जाऊन रेकी केली का? हे तपासायचे आहे? या कटात कोणी सहभागी आहे का? केतनचा मोबाईल काही वेळाने देण्यात आला, त्यातील माहिती रिकव्हर करायची आहे, त्यांनी माहिती लपवली आहे, ती मिळवायची आहे. तसेच, चेतनचे कपडे हस्तगत करायचे आहेत, त्यामुळे आरोपींना सात दिवसांची पीसी मिळावी, अशी मागणी पोलिसांच्यावतीने करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ५ दिवसांची पीसी दिली.

## शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी केंब्रीज चौकात आंदोलन



छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी देण्यासह अन्य मागण्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथील केंब्रीज चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी अनेक ठिकाणाहून हजारोच्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. सरकारने लावलेल्या अटी व शर्ती विरोधात उपस्थित शेतकऱ्यांमध्ये संताप पाहायला मिळाल.

सरसरकट कर्जमाफी देण्यासाठी बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याचा पंढरपूरल ा विठुरायाच्या पवित्र भूमीत दिलेला शब्द न पाळता विश्वासघात केल्याने या सरकारविरोधात आम्ही हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगरमध्ये एल्गार पुकारला असल्याचे रोहित पवार म्हणाले.

आज देशात शेतकरी, बेरोजगार, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून सत्ताधारी सरकार मोठ्या उद्योगपतींच्या हिताचे निर्णय घेत आहे. शेतकऱ्यांचा सातबारा अदानी-अंबानी च्या नावाने करण्याचा धंदा या सरकारने लावला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ट्रम्प च्या ताटाखालचे मांजर होवून बसले आहेत. देशाला प्रगतीच्या उलट्या दिशेने घेवून जाण्याचे काम नरेंद्र मोदी सरकारच्या माध्यमातून होतं आहे. संपूर्ण कर्जमाफी हा शेतकऱ्यांचा हक्क आहे, उपकार नाही... आज आपण शांत बसलो, तर उद्याची पिढी आपल्याला कधीच माफ करणार नाही, असे मत यावेळी व्यक्त केले.

या एल्गार आंदोलनात संपूर्ण मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांसह खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ नेते. अनिल देशमुख, खा. निलेश लंके, खा. कल्याण काळे, खा. अमर काळे, खा. बजरंग सोनवणे, राजेश टोपे, आ. संदिप क्षीरसागर, (पान ४ वर)

## शिर्डीचा खासदार एक नंबरचा बदमाश-संजय राऊत

शिर्डी दि.२९ (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या ६ खासदारांनी बंडखोरी करत उद्धव ठाकरे यांची साथ सोडून शिवसेना शिंदे गटाची वाट धरल्याने महाराष्ट्रातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. या पार्श्वभूमीवर, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात जाऊन थेट मतदारांशी आणि शिवसैनिकांशी संवाद साधत आहेत. आज शिर्डी येथील सिद्ध संकल्प कार्यालयात शिवसेना ठाकरे गटाचा भव्य कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना खासदार संजय राऊत यांनी शिर्डीचे बंडखोर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर घणाघाती टीका केलीय. मेळाव्यात शिवसैनिकांना संबोधित करताना संजय राऊत कमालीचे आक्रमक झाले होते. ते म्हणाले, "या गद्दार खासदाराचे काही करू नका, रस्त्यात दिसला की ऑपरेशन तुडवा करा. शिर्डीमध्ये तरी दाऊदचे नाव घेऊ नका. येथील एका मुस्लिम मावळ्याने बोर्ड लावलाय की, शेवटपर्यंत ठाकरेंसोबत राहणार; ही केवळ त्याचीच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राची भावना आहे. आपण सर्वजण साईबाबांच्या दरबारात आलो आहोत." खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दुसऱ्यांदा बंडखोरी केल्याने शिर्डी मतदारसंघात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच मुद्द्यावरून राऊतांनी वाकचौरेंवर निशाणा साधला. ते म्हणाले, "या ठिकाणचा खासदार एक नंबरचा बदमाश आहे. त्याने एकदा गद्दारी केली होती, परत माफी मागत आला आणि खासदार झाला; पण आता पुन्हा १०० कोटीला विकला गेला. मध्यंतरी उद्धव ठाकरे यांनी त्याला विचारले होते की, भाऊसाहेब, तुमच्याबद्दल काहीतरी ऐकायला येतंय. त्यावर या माणसाने चक्क तीन वेळेस साईबाबांची शपथ घेतली होती. एक रुपया खर्च न करता भाऊसाहेब खासदार झाला, कारण निवडणुकीतील सर्व पैसे पक्षाने खर्च केले आणि प्रचार शिवसैनिकांनी केला. मात्र, हा माणूस १०० कोटीला विकला गेला, अशी टीका त्यांनी केली.

## टीईटी पेपरफुटीची सीबीआय चौकशी करा; विरोधकांकडून शिक्षण मंत्र्यांची राजीनाम्याची मागणी

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणावर महाराष्ट्र विधान परिषदेत सोमवारी विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, शिक्षणमंत्री दादा भुसे यांची राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली. यावर चर्चेची मागणी केली असता ती सभापती राम शिंदे यांच्याकडून फेटाळण्यात आल्याने हौदात येत विरोधकांनी जोरदार घोषणा दिल्या, यावेळी झालेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.

शिवसेना (ठाकरे) सदस्य अंबादास दानवे, ज. मो. अभ्यंकर, काँग्रेसचे सतेज पाटील, अभिजित वंजारी, यांच्यासह अन्य सदस्यांनी नियम २८९ अंतर्गत कामकाज स्थगित करून या गंभीर विषयावर सविस्तर चर्चा घेण्याची मागणी केली. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एसआयटीमार्फत चौकशी सुरू असल्याचे सांगून दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. मात्र, विरोधकांचे समाधान न झाल्याने सभागृहात जोरदार गोंधळ झाला आणि अखेर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.

अंबादास दानवे यांनी नीट परीक्षेच्या पेपरफुटीचा संदर्भ देत, त्या घटनेनंतरही सरकारने टीईटी परीक्षेबाबत आवश्यक खबरदारी घेतली नसल्याचा आरोप केला. भिवंडी येथे टीईटीचा पेपर फुटल्याची घटना ही राज्याच्या परीक्षा व्यवस्थेतील गंभीर अपयश असल्याचे ते म्हणाले.

टीईटी ही शिक्षक होण्यासाठीची पहिली आणि महत्त्वाची परीक्षा असून, अशा परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटणे म्हणजे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का (पान ४ वर)

## खामेनींच्या अंत्यविधीला भारताचे प्रतिनिधी जाणार

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यसंस्कारासाठी भारताकडून उच्चस्तरीय शिष्टमंडळ पाठवले जाणार आहे. बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन आणि परराष्ट्र राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पुढील महिन्यात इराणचा दौरा करणार आहेत. या नेत्यांसोबत परराष्ट्र मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित असणार आहेत. खामेनी यांच्या अंत्यविधीचे विधी ४ जुलैपासून तेहरानमध्ये सुरू होतील, तर ९ जुलै रोजी त्यांच्या 'मशहद' या मूळ गावी त्यांना दफन केले जाईल. आधी हा अंत्यविधी मार्च महिन्यात होणार होता, परंतु त्या काळात मध्यपूर्वेत पेटलेल्या युद्धामुळे तो पुढे ढकलण्यात आला होता.

## आमचा खासदार पळालाय, सापडला तर सोडू नका-उद्धव ठाकरे

शिर्डी दि.२९ (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे सध्या बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांमध्ये झंझावाती दौरे करत आहेत. या मोहिमेत आज त्यांनी शिर्डीचे आराध्य दैवत साईबाबांचे मनोभावे दर्शन घेतले आणि त्यानंतर आयोजित जाहीर सभेतून शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर शब्दांचे तीक्ष्ण बाण सोडले. "काहींच्या नसानसात आणि रक्तातच गद्दारी भिनलेली असते, त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भाऊसाहेब. हा भाऊसाहेब नव्हे, तर खाऊसाहेब वाकचौरे आहे. जिथे जाईल तिथे फक्त खाऊ खायचा, हाच यांचा एककलमी कार्यक्रम आहे," अशी घणाघाती टीका ठाकरेंनी केली.

सभेच्या सुरुवातीलाच मैदानावर घडलेल्या एका गमतीशीर प्रसंगाचा धागा पकडत उद्धव ठाकरेंनी विरोधकांना जोरदार टोला लगावला. ते म्हणाले, "मी भाषणाला उभा राहण्यापूर्वी इथे एक अनाऊन्समेंट झाली की, कोणाच्या तरी गाडीची चावी हरवली आहे, ती सापडल्यास आणून द्यावी. मलाही तुम्हाला एक तशीच महत्त्वाची सूचना करायची आहे; आपला इथला खासदार पळाला आहे! तो जर तुम्हाला कुठे सापडला, तर त्याला सोडू नका आणि अजिबात परत आणू नका. आता या जगात नक्की विश्वास तरी कोणावर ठेवायचा, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे."

खासदार वाकचौरे यांच्या बंडखोरीवर बोलताना ठाकरेंनी २०१४ मधील एका राजकीय योगायोगाची आठवण करून दिली. "सभेला येण्यापूर्वी मला काही स्थानिक लोक भेटले. ते म्हणाले की, साहेब या गद्दाराचे जाणे हा आपल्यासाठी शुभशकुन आहे. २००९ मध्ये आपण याला हक्काने निवडून दिले, पण २०१४ ला हा पळून गेला. हा पळाला आणि राज्यात आपले सरकार आले! यंदाही इतिहास पुनरावृत्त होणार आहे. या गद्दारांच्या पापाचा घडा भरला असून हे विद्यमान सरकार पडल्याशिवाय राहणार नाही," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिर्डीच्या पावन भूमीचा संदर्भ देत उद्धव ठाकरेंनी गद्दारांच्या नैतिकतेवर बोट ठेवले. ते म्हणाले, "ही पवित्र शिर्डी नगरी आहे, जिथे साईबाबांच्या श्रद्धा आणि सबुरीला सर्वोच्च स्थान आहे. माणसाची कुठेतरी निष्ठा असावी लागते. आपली निष्ठा साईबाबांवर, जनतेच्या कामावर आणि भगव्या झेंड्यावर आहे. पण या गद्दारांची कशावरच श्रद्धा नाही (पान ४ वर)

## मल्लिकार्जुन खर्गेंची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. खर्गे यांनी सोमवारी राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्या कक्षात खासदारकीची शपथ घेतली. यानंतर २६ जून २०२६ पासून खर्गे यांना पुन्हा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्त करण्यात आले.

मल्लिकार्जुन खर्गे यांचा राज्यसभेतील कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी समाप्त झाला होता. नियमांनुसार २६ जूनपासून त्यांचे विरोधी पक्षनेतेपद देखील समाप्त झाले. पण, त्यानंतर राज्यसभेच्या झालेल्या निवडणुकीत खर्गे पुन्हा निवडून आले. राज्यसभेचे खासदार झाल्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली. २६ जून २०२६ पासूनच त्यांना पुन्हा विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता देण्यात आली आहे. खर्गे यांच्या शपथविधीला सोनिया गांधी आणि खासदार प्रियांका गांधी उपस्थित होत्या.

## राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणातील आरोपींचे वकीलपत्र घेण्यास वकीलांचाच विरोध

अयोध्या दि.२९ (वृत्तसंस्था)- अयोध्या राम मंदिर निधी अपहार प्रकरणातील आरोपींचे वकिलीपत्र न स्वीकारण्याचा निर्णय उत्तर प्रदेशातील फैजाबाद बार असोसिएशनने घेतला आहे. सोमवारी झालेल्या आमसभेत बार असोसिएशनने इशारा दिली की, जो कोणताही वकील आरोपींची बाजू कोर्टात मांडेल, त्याला ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला जाईल. या सभेत वकिलांनी या वादाशी संबंधित चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाळ राव यांना तीन दिवसांच्या आत अयोध्या सोडण्याची मागणी केली असून, तसं न केल्यास चक्काजाम करण्याचा इशारा दिला आहे.

चंपत राय हे श्री रामजन्मभूमी ट्रस्टचे सरचिटणीस होते आणि त्यांनी नुकतेच दुसरे विश्वस्त अनिल मिश्रा यांच्यासह आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. २००५ मध्येही राम मंदिर दहशतवादी हल्ला प्रकरणातील आरोपींचेही वकिलीपत्र स्वीकारण्यास बार असोसिएशने नकार दिला होता. "मंदिराच्या देणगीत झालेल्या चोरीमुळे आमच्या भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत", असं बार असोसिएशनचे सचिव शैलेंद्र जयस्वाल म्हणाले. फैजाबादमधील सर्व वकिलांनी अटक केलेल्या आरोपींचा बचाव न करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर बार असोसिएशनचे अध्यक्ष कालिका प्रसाद मिश्रा यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. "या प्रकरणात एकही वकील आरोपींचे प्रतिनिधित्व करणार नाही आणि जर कोणी तसे केले तर त्यांच्यावर ५ लाख रुपयांचा दंड लादला जाईल", असं ते या क्लिपमध्ये सांगताना दिसत आहेत आणि आजूबाजूचे वकील टाळ्या वाजवून या घोषणेचे स्वागत करत आहेत.

## राज्यभरात पुन्हा पावसाचा जोर वाढणारा; विदर्भ, कोकणासह २२ जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्यात दाखल झालेल्या मॉन्सूनने गेल्या काही दिवसापासून विश्रांती घेतल्याचे बघायला मिळाले होते. तर मॉन्सूनच्या पावसाने गती संथ केल्याने पावसाची बळीराजासह साऱ्यांना पावसाची प्रतिक्षा लागून राहिली होती. अशातच पावसाने पुन्हा एकदा जोर धरल्याचे बघायला मिळते आहे. मुंबई, उपनगरसह ठाण्यात रविवारच्या रात्री तुफान पावसाला सुरुवात झाली. ठाण्यात रात्री ११ नंतर जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. अवघ्या एका तासात २९ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली.

दुसरीकडे, हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात २२ जिल्ह्यांत पावसाची शक्यता असून, २ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर २० जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला असून, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत मेघगर्जना, विजांसह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. परिणामी महाराष्ट्रात आज अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून हवामान विभागाने चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

नैऋत्य मोसमी वारे (मान्सून) पुढील काही दिवसांत देशाच्या आणखी काही भागांत पुढे सरकण्याची शक्यता असून, त्यामुळे अनेक क्षेत्रांत पावसाचा जोर वाढणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत मान्सून गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या आणखी काही भागांत प्रगती करण्याची शक्यता आहे. मान्सूनची प्रणाली अधिक बळकट होत असून, भारतातील विविध भागांत पावसासाठी पोषक अशा अनेक हवामान प्रणाली कार्यरत असल्याचे हवामान विभागाने नमूद केले.

# मेहनतीशिवाय यश नाही

विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षेतील गुणांवर अवलंबून नसून आत्मविश्वास, नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन यावरही तेवढेच अवलंबून असते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मेहनत, पालक-शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध दिनचर्या अंगीकारल्यास प्रत्येक विद्यार्थी यशाचे शिखर गाठू शकतो.

उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू होऊन आजचा तेरावा दिवस आहे. विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे आवश्यक आहे. तरच तो विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी त्यांच्या मनात स्वत:चा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. तो आत्मविश्वास पालक आणि शिक्षकवर्गांने निर्माण करायला हवा. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालक आणि शिक्षक अधिक जवळचे असतात. त्यामुळे त्यांची आवडनिवड व सवय त्यांना माहीत असते. बरेच विद्यार्थी परीक्षेपर्यंत बेसावध असतात. परीक्षा जवळ आली की, रात्रीचा दिवस करून अभ्यासाला लागतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मन विचलित होते. पुढे काय करावे त्यांनाच समजत नाही. त्यांच्या मनावरील दडपण वाढते. याचा परिणाम त्याला कमी गुण किंवा त्या परीक्षेत अपशय येऊ शकते. यासाठी मुलांनी विद्यार्थी म्हणून यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. तसेच अभ्यासामध्ये नियमित सातत्य ठेवावे लागेल. कठोर परिश्रम आणि अभ्यासात सातत्य ठेवण्यासाठी अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करावे लागेल. त्यांनी या तीन गोष्टी पाळल्या, तर परीक्षेत उत्तम गुण मिळू शकतात.

आपण सहज परीक्षेत यश संपादन करू शकतो असे जरी विद्यार्थ्यांना वाटत असले तरी तितके ते सोपे नसते. मुळात त्याला शिकण्याची आवड पाहिजे. म्हणजे तो पुढे काहीतरी करू शकतो. खरे म्हणजे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यावर पहिल्या सुरुवातीपासून विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागावे. शाळेमध्ये ज्या धड्याचे अध्ययन झालेले असेल त्याची घरी आल्यावर उजळणी करावी. त्या आधी पूर्ण धडा वाचावा म्हणजे आपण त्या धड्यात काय शिकणार आहोत याची कल्पना येते. त्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करावे लागेल. त्याप्रमाणे रोज अभ्यास करावा म्हणजे अभ्यास करण्याची सवय लागते. तसेच विद्यार्थ्यांनी विषयांचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ताणतणाव वाढत नाही. परीक्षेच्या वेळी अधिक उत्साहाने जातात.

आपण एक विद्यार्थी आहोत याची जाणीव त्यांना असायला हवी. शाळेची वेळ, घरातील इतर कामे आणि मोकळा वेळ गृहीत धरून विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करावे लागेल. म्हणजे विषयांचे वेळापत्रक तयार करून दर दिवशी दिलेल्या वेळेनुसार अभ्यास करावा लागेल. या पद्धतीमुळे अभ्यासात सातत्य राहील. अभ्यास नियमितपणे केला जाईल. असे जरी असले तरी अवांतर वाचनसुद्धा अतिशय महत्त्वाचे असते. शाळेमध्ये शिक्षक अध्यापन करीत असताना लक्षपूर्वक ऐकावे. त्यातल्या काही आवश्यक मुद्द्यांचे टिपण करावे. काही शंका असल्यास बिनधास्तपणे अध्यापकांना विचाराव्यात. चुकीचे समजून घेऊ नये. यात आपलेच नुकसान आहे. म्हणजे अध्यापक वर्गात अध्ययन करीत असताना विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे. बऱ्याच वेळा धड्याखाली जे प्रश्न विचारलेले असतात तेच प्रश्न परीक्षेच्या वेळी विचारले जातात. तेव्हा त्या प्रश्नांची जी अचूक उत्तरे असतील त्याची नियमित उजळणी करणे गरजेचे असते. तसेच जे प्रश्न दिलेले असतील त्या उत्तरांची सुद्धा उजळणी व्हायला हवी. दुर्लक्ष केल्यास परीक्षेच्या वेळी जर तो प्रश्न विचारला गेल्यास अचूक उत्तर आपण लिहू शकत नाही. तेव्हा विषयाचे अध्ययन जरी झाले तरी प्रश्नांच्या उत्तरांची वेळच्यावेळी उजळणी करावी लागेल. म्हणजे परीक्षेला उत्तरे लिहिताना अडथळा येणार नाही. अधिक आत्मविश्वासाने परीक्षेची उत्तरपत्रिका सोडवू शकतो. हे सर्व नियमित अभ्यास आणि उजळणी केल्यामुळेच शक्य होऊ शकते.

विशेष म्हणजे प्रत्येक दिवशी सर्व विषयांची उजळणी करणे शक्य नसते. अशावेळी आपल्याला जो धडा कठीण वाटत असेल त्याचीच उजळणी करावी. म्हणजे पुढील धडा दुसऱ्या दिवशी घेता येतो. यासाठी आपले योग्य धेय्य असले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेशी झोप आणि सकस आहार दैनंदिन आहारात दिला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित होते. अन्यथा मन विचलित होऊ शकते. हा निसर्गाचा नियम आहे. याची काळजी सर्व पालकांनी घेतली पाहिजे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र जागा पाहिजे. खेळती हवा, शांत वातावरण आणि पुरेसा प्रकाश असावा. अभ्यास करताना मध्येच थोडी विश्रांती घ्यावी. अभ्यासामध्ये काही शंका असल्यास शिक्षकांना विचारून वेळच्या वेळी शंकांचे निरसन करावे. हल्लीची मुले व्यसनाच्या आहारी गेलेली पाहायला मिळतात. हे टाळण्यासाठी योग्य वयात मुलांना व्यसनापासून सतर्क करणे गरजेचे आहे. संदेश देणे बंधनकारक आहे. तसेच सध्या टीव्ही बाजूला होऊन मोबाईलचा अतिरिक्त वापर होत आहे. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तेव्हा योग्य कामासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करावा. अन्यथा मोबाईलला चार हात दूर ठेवावे. प्रत्येकाच्या जीवनात कधी यश, कधी अपयश आहे. मात्र अपयशाने खचून न जाता त्यावर मात करून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सुद्धा असेच करायला हवे. अपयशाने खचून न जाता आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. यश आपलेच असते. यातूनच विद्यार्थी यशस्वी होत असतात.

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

**राज्य** शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे.

कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.

एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल, या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**-काशीबाई थोरात-धायगुडे**
(वरिष्ठ सहायक संचालक)

# सहकार, साखर आणि सत्ता समीकरणे

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा यांचा इचलकरंजी दौरा सहकाराच्या चौकटीपलीकडे जात पश्चिम महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा संकेत देणारा ठरला. सहकार, साखर आणि वस्त्रोद्योगाच्या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या दौऱ्यातून भाजपने सहकार क्षेत्रातील आपली पकड मजबूत करण्याचा संदेश दिल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचा नुकताच झालेला इचलकरंजी दौरा हा केवळ एका सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनापुरता किंवा कारखान्याच्या नामविस्ताराच्या कार्यक्रमापुरता मर्यादित राहिला नाही. दौऱ्यापूर्वी या भेटीकडे सहकार क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न, साखर उद्योगाच्या अपेक्षा आणि वस्त्रोद्योगाला मिळू शकणाऱ्या संभाव्य दिलाशाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात होते. मात्र, कार्यक्रमानंतर शहा यांच्या भाषणातील मुद्दे आणि त्यातून देण्यात आलेल्या राजकीय संदेशामुळे पश्चिम महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. इचलकरंजी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन मुख्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त राज्यभरातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे पदाधिकारी तसेच भाजपचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिले.

या निमित्ताने शहरी सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळावरील निर्बंध, डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि नियामक अडचणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, शाह यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणावर भाष्य करतानाच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा, घुसखोरी आणि विरोधी पक्षांच्या राजकारणावरही थेट भूमिका मांडली. 'भारत ही काही धर्मशाळा नाही,' असे म्हणत त्यांनी काँग्रेस तसेच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अधिक तीव्र शब्दांत टीका केली.या वक्तव्याचे राजकीय विश्लेषण करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक ठरते. पश्चिम महाराष्ट्र हा राज्याच्या राजकारणात नेहमीच प्रभावशाली प्रदेश राहिला असून, विशेषतः सहकार चळवळीचा तो पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो.

साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी पतसंस्था आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून येथील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेची घडी अनेक दशकांपासून बसलेली आहे. या सहकार व्यवस्थेवर दीर्घकाळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसशी संबंधित नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीत भाजपने सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून सहकारी संस्थांमध्ये अधिक सक्रिय सहभाग वाढवणे, नव्या नेतृत्वाला संधी देणे आणि पारंपरिक राजकीय समीकरणांना आव्हान देण्याचा प्रयत्न भाजपकडून होत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील हालचालींना सध्या विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. इचलकरंजीची निवडही याच व्यापक राजकीय रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असलेल्या या शहराचा सहकार क्षेत्राशीही मोठा संबंध आहे.

इचलकरंजीतून दिलेला राजकीय संदेश केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित राहत नाही, तर कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांपर्यंत त्याचा प्रभाव जाणवू शकतो. त्यामुळे या भागातील राजकीय पकड मजबूत करण्यासाठी भाजपकडून या दौऱ्याकडे संघटनात्मक विस्ताराची संधी म्हणून पाहिले जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच भविष्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात स्थान निर्माण करणे हे भाजपच्या राजकीय अजेंड्याचा महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. पारंपरिक सहकार राजकारणातील बदल, नव्या राजकीय समीकरणांची निर्मिती आणि ग्रामीण भागातील संघटन वाढवण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दुसरीकडे, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांचे लक्ष या दौऱ्यातून काही ठोस निर्णय आणि तातडीच्या उपाययोजनांकडे लागले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सहकार क्षेत्रासाठी साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य देणारी मदत, ऊस उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सहकारी बँकांसमोरील नियामक व आर्थिक अडचणी, तसेच डिजिटल सुविधांचा विस्तार यासंदर्भात सकारात्मक घोषणा होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, दौऱ्यात मांडलेल्या विचारांमध्ये सहकार क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात व्यापक धोरणात्मक भूमिका दिसून आली असली तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने तातडीच्या निर्णयांची अपेक्षा असलेल्या घटकांना काही प्रमाणात निराशा जाणवली. सहकारी संस्थांना भेडसावणाऱ्या रोजच्या अडचणी, शेतकरी आणि कारखानदारांसमोरील आर्थिक प्रश्न, तसेच सहकारी बँकांच्या कामकाजातील अडथळ्यांवर ठोस घोषणा न झाल्याची भावना काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर इचलकरंजी दौऱ्याचे राजकीय आणि सामाजिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

दौऱ्यापूर्वी सहकार, उद्योग आणि विकास हे प्रमुख मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी होते; मात्र दौऱ्यानंतर राजकीय संदेश, विचारधारा आणि सहकाराच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या नव्या समीकरणांवर अधिक चर्चा सुरू झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रावर दीर्घकाळ प्रभाव असलेल्या पारंपरिक राजकीय नेतृत्वाला पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे. सहकारी संस्था, साखर कारखाने, बँका आणि स्थानिक नेतृत्व यांच्यामध्ये नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करण्याची रणनीती या दौऱ्यातून अधिक स्पष्ट झाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. भाजपकडून सहकार क्षेत्राला केवळ आर्थिक किंवा प्रशासकीय विषय म्हणून न पाहता, त्याला राजकीय विस्ताराचे माध्यम म्हणून वापरण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसून येते. मात्र, हा प्रयत्न प्रत्यक्षात कितपत यशस्वी होईल, हे आगामी काळात सहकारी संस्थांमधील निर्णय, स्थानिक नेतृत्वाची भूमिका आणि शेतकरी वर्गाचा प्रतिसाद यावर अवलंबून राहणार आहे. एकूणच, इचलकरंजी दौरा हा केवळ एका नेत्याचा कार्यक्रम न राहता पश्चिम महाराष्ट्रातील सहकार आणि राजकारणाच्या बदलत्या प्रवाहाचा संकेत देणारा ठरला आहे. आता खरी परीक्षा ही असेल की, या दौऱ्यातून दिलेला संदेश केवळ भाषणांपुरता मर्यादित राहतो की सहकार क्षेत्रात प्रत्यक्ष धोरणात्मक बदल घडवून आणत नव्या राजकीय आणि आर्थिक अध्यायाची सुरुवात करतो.

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

**महाराष्ट्राची** संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना (जढड): ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (जढड) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी

आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन:** अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता** – कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन: आधार प्रमाणिकरण अनिवार्य** – शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे.पात्र शेकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (जढड) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा**

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय**

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

- काशीबाई थोरात-धायगुडे
(वरिष्ठ सहायक संचालक)

# महाकर्जमाफीच्या अंमलबजावणीला वेग

महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांना पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती**

**एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

**यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती**

जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

**एकवेळ समझोता योजना (OTS):** ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन:** अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निमिर्ण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता**

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन**

**'आधार प्रमाणिकर' अनिवार्य**

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेकऱ्नी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. आणि एकवेळ समझोता **(OTS)** योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा**

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय**

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

**–काशीबाई थोरात–धायगुडे**
वरिष्ठ सहायक संचालक
मंत्रालय, मुंबई

# वैजापूर जेष्ठ नागरिकांनी केला आनंददायी व निरोगी जीवन जगण्याचा संकल्प

वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – व्यक्तिला वृद्धत्व येणे ही मर्यादा नाही तर ती एक देणगी आहे. योग्य दृष्टीकोन आणि योग्य सवयी सोपी योगासने ,चालणे, फिरणे जीवनात असेल व फळ फळावर,भाजीपाला आहारात असेल तर ६०वर्षानंतर चे आयुष्य निरोगी,आनंदी, व सुंदर जगता येते असे प्रतिपादन जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या रविवार(ता.२८) रोजी सर्वसाधारण सभेत केले. ते पुढे म्हणाले की,जेष्ठ नागरिकांनी वाढत्या वयाकडे आनंदाने पहावे.त्यांनी सर्व जेष्ठ नागरिकांना जपानी मणस शास्त्रज्ञाने लिहिलेले'द ऐटी ईयर ओल्ड वॉल'

या पुस्तकातील भाग्यवान जीवनाचे रहस्य ४४ वाक्यात सांगितले व सर्वांना आनंददायी व निरोगी राहण्याचा संकल्प दिला. श्री.दिसले यांनी शीर्षानं व अन्य योगा करून दाखविले. तर सेवा निवृत्त फौजदार सोपानराव निकम यांनी शेरओ शायरी सांगून जेष्ठांना हसविले,ॲड धरमसिंह राजपूत यांनी आनंदी व निरोगी जीवनासाठी अध्यात्म मार्ग स्वीकारवा असे सुचविले, जेष्ठतम नागरिक रामदास व्यवहारे यांनी पसायदान सादर केले.या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्रकाशशेठ बोथरा होते तर व्यासपीठावर शहरातील जेष्ठतम नागरिक झुंबरलाल शर्मा,गोपालदास आसर,भगवान नाना तांबे,रवींद्र आप्पा साखरे, काशिनाथशेठ गायकवाड यांची उपस्थिती होती. प्रथम भारतमाता पूजन व पसायदान झाले.,सहसचिव संपतराव डोंगरे यांनी प्रार्थना सादर केली. ज्ञात,अज्ञात देवाज्ञा झालेल्याना श्रद्धांजली अर्पण करून ज्या जेष्ठ नागरिकांचे वाढ दिवस मागील दोन महिन्यांत होते,त्या जेष्ठ नागरिकांना



गुलाब पुष्प व शाल अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा यांनी देऊन त्यांना वाढ दिवस शुभेच्छा दिल्या.कोषाध्यक्ष सुरेश संत यांनी अहवाल वाचन केले,जवाहर कोठारी व गोकुलसिंह राजपूत यांनी मनोगत व्यक्त केले.सेवा निवृत्त प्राचार्य डॉ, व्ही.एन, ढाकरे यांनी आभार मानले.

संघाचे संचालक सर्वश्री बाबासाहेब गायकवाड, बबनराव क्षीरसागर, मुकुंदशेठ दाभाडे, भगवानसिंह राजपूत यांनी सहभाग नोंदविला.या प्रसंगी पी.वाय. चव्हाण,एस. डी. त्रिभुवन, प्रकाश माळी,सुभाष आंबेकर, सोन्याबापू गावडे,गोविंद दाभाडे, सुरेश धुमाळ,नंदलाल मुगदिया ,प्रा, किसन बोरनारे,प्रा पी.जी.श्रीवास्तव ,कारभारी गायकवाड यांची ही उपस्थिती होती

# वैजापूर शहर व तालुक्यात पोलिओ लसीकरणाला उत्तम प्रतिसाद





वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – राष्ट्रिय पल्स पोलिओ लसीकरणाला वैजापूर शहर व तालुक्यात रविवार (ता.२८)रोजी महिला व पुरुष नागरिकांनी आपल्या एक दिवसाच्या बाळापासून ते पांच वर्ष पर्यंतच्या छोट्या मुलां–मुलींना लसीकरण बुथवर आणून लसीचे दोन थेंब पाजून घेतले. येथील उपजिल्हा रुग्णालयात तालुक्याचे आमदार प्रा.रमेश. पा. बोरनारे व नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी,तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरविंद हरबडे ,वैद्यकीय अधिकारी डॉ.सुधाकर मुंडे,भागीनाथ दादा मगर व जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी बालकांना पोलिओ लसीचे दोन थेंब पाजून शुभारंभ केला.शहरात लसीकरणांचे २३ केंद्र होते यावर ६३आरोग्य कर्मचारी व ५ सुपरवायझर व ५वैद्यकीय अधिकारी निरीक्षण साठी नियुक्त होते. त्याचप्रमाणे एक फिरती लसीकरण व्हॅन ही वैद्यकीय अधीक्षक डॉ.हरबडे यांनी नेमलेली होती या केंद्रावर सकाळ पासूनच पालकांनी आपल्या चिमुकल्या सह गर्दी केली होती.जी बालके लसीपासून वंचित राहिली आहेत त्यांच्यासाठी सोमवार (ता.२९) पासून शुक्रवार (ता. ३ जुलै) पर्यंत घरोघरी जाऊन राहिलेल्या बालकांचे लसीकरण करण्यात येणार आहे.नागरिकांनी आपल्या राहिलेल्या बाळांचे या कालावधीत लसीकरण करून घ्यावे असे आवाहन डॉ.हरबडे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील केंद्रावर पालकांनी वरील काळात जाऊन आपल्या पांच वर्षा आतील मुला–मुलींचे लसीकरण करून घेतले आहे.या मोहिमेत जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पायाळ, डॉ.धोत्रे मुख्य नर्सेस श्रीमती मोहाडीकर, श्रीमती जंगम, श्रीमती मनीषा, श्रीमंती सातदिवे व किशोर वाघुले,विजय पाटील, श्री चौधरी, श्री मापारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार जाहीर

## 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'कडून ऑगस्टमध्ये गौरव

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील गेल्या ३७ वर्षांच्या योगदानाची दखल घेत 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेच्या वतीने त्यांना 'एमिनेंट इंजिनियर' हा देशपातळीवरील मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.



अमरावती येथे येत्या २१ व २२ ऑगस्टला आयोजित 'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनामध्ये संचालक श्री. राजेंद्र पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या दोन दिवसीय अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. देशाच्या तांत्रिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत.

श्री. राजेंद्र पवार यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता पदापर्यंत काम केले आहे. या ३६ वर्षांच्या कालावधीत प्रामुख्याने ग्रामीण भागातील दऱ्याखोऱ्यांसह घरगुती, शेती, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात नवीन वीजयंत्रणा उभारणे, नवीन वीजजोडण्या आणि सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उल्लेखनीय कामे केली आहेत. एप्रिल २०२५ पासून श्री. पवार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) म्हणून कार्यरत आहे. विद्युत क्षेत्रात श्री. राजेंद्र पवार यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना आयईआय संस्थेकडून हा मानाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# 'मिर्झापूरः द मूव्ही'चा टीझर इंटरनेटवर सुपरहिट!

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – अखेर चाहत्यांची बहुप्रतीक्षित प्रतीक्षा संपली आहे. 'मिर्झापूरः द मूव्ही'चा दमदार टीझर प्रदर्शित होताच सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. रिलीजच्या काही तासांतच हा टीझर ध्रीेढीलश ट्रेंडिंगमध्ये थेट क्र१ स्थानावर पोहोचला असून, इंटरनेटवर 'भौकाल'ची जोरदार चर्चा रंगली आहे. या टीझरमुळे 'मिर्झापूर'च्या सिनेमॅटिक विश्वाची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळाली असून, चित्रपटाबद्दलची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.टीझरमध्ये पंकज त्रिपाठी, अली फझल आणि दिव्येंदू शर्मा आपल्या लोकप्रिय भूमिकांमध्ये पुन्हा एकदा प्रभावी अंदाजात दिसत आहेत. 'मिर्झापूर'ची ओळख असलेली दमदार ॲक्शन, रक्तरंजित संघर्ष, सत्तेची लढाई आणि तुफान संवाद यांची झलक या टीझरमध्ये पाहायला मिळते. ओटीटीवर प्रचंड लोकप्रिय ठरलेली ही फ्रँचायझी आता मोठ्या पडद्यावर आणखी भव्य स्वरूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. टीझरमधील हाय–ऑक्टेन ॲक्शन सीक्वेन्स, सिनेमॅटिक व्हिज्युअल्स आणि लक्षवेधी डायलॉग्समुळे सोशल मीडियावर चाहत्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. श्चळीूर्रीीढहशचेींळश हा हॅशटॅगही वेगाने ट्रेंड होत असून, अनेकांनी हा टीझर आतापर्यंतचा सर्वात दमदार असल्याचे म्हटले आहे. चाहत्यांकडून मिळालेल्या या भरभरून प्रतिसादानंतर निर्मात्यांनी सोशल मीडियावर आनंद व्यक्त करत म्हटले, "YouTube वर MirzapurTheMovie चा टीझर क्र१ वर ट्रेंड करत आहे! आता खरा भौकाल ४ सप्टेंबरला सिनेमागृहांमध्ये पाहायला मिळेल.'

# श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील अपहार प्रकरण; दोषींवर कठोर कारवाई करावी !

## - हिंदु जनजागृती समितीची मागणी

अयोध्येतील श्रीराममंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते जगभरातील कोट्यवधी हिंदूंच्या शतकानुशतकांच्या बलिदान, प्रदीर्घ संघर्ष आणि श्रद्धा यांचे प्रतीक आहे. मंदिराच्या दानपेटीतील अर्पणात अपहार करणे, हे महापाप असून प्रभू श्रीराम त्यांच्या कर्माची शिक्षा त्यांना देईलच. पण शासनाने या प्रकरणी कोण दोषी आहेत, याचा शीघ्रतेने तपास करून सत्य जनतेसमोर आणायला हवे आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई करायला हवी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. आम्ही यापूर्वी ही मागणी अनेकदा केली आहे की, कोणत्याही मंदिराच्या समितीमध्ये केवळ भगवंताचे भक्तच असायला हवेत. भक्त हा ईश्वराचा उपासक असल्याने तो देवनिधी चोरण्याचा विचार स्वप्नातही करू शकत नाही. खऱ्या अर्थाने मंदिरांचा उद्धार करायचा असेल, तर भगवंताचे असे भक्तच मंदिर व्यवस्थेमध्ये असावेत. अशा प्रकरणांमुळे 'मंदिर सरकारीकरण' करण्याचा प्रयत्न शासन करत असते, त्याला आमचा कायम विरोध राहिल, अशी भूमिकाही समितीने घेतली आहे.

जे सरकारी अधिकारी स्वतः भ्रष्ट असतात, जे सरकारी अधिकारी शासन यंत्रणेत खोलवर रुजलेल्या भ्रष्ट व्यवस्थेचा भाग असतात, ते सरकारी अधिकारी मंदिर समितीतील भ्रष्टाचार कसा काय रोखू शकतील. त्यामुळे धार्मिक स्थळी धर्मनिरपेक्ष शासनाचा हस्तक्षेप नकोच. मंदिरांचे सरकारीकरण केल्यानंतर मंदिराच्या निधीमध्ये भ्रष्टाचार वाढला असल्याची अनेक उदाहरणे देशभरात आहेत. या दृष्टीने भगवंताचा खरा भक्त, जो मंदिराचे दायित्व भगवंताची सेवा म्हणून स्वीकारून करेल, अशा भक्तांकडे मंदिरांचे दायित्व सोपवायला हवे, असे मत हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी व्यक्त केले.

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'; जिल्ह्याची गतिमान प्रक्रिया

**महाराष्ट्र** शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' च्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी सुरवात केली आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने योजनेच्या पोर्टलवरील माहिती अपलोड करण्याच्या प्रक्रियेत पुढाकार घेऊन माहिती अपलोड करण्यात एक आदर्श ठेवला आहे.

योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून. या समितीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मीन्नू पी. एम, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे,आणि व्यापारी बँकांचे जिल्हा समन्वयक यांचा समावेश आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्थाहे या समितीचे 'सदस्य सचिव' म्हणून समृध जाधव काम पाहणार आहेत.

**समितीची प्रमुख उद्दिष्टे :** योजनेच्या अंमलबजावणीचे सूक्ष्म नियोजन व नियंत्रण. केले जाणार असून आधार लिंक नसलेल्या कर्ज खात्यांची यादी प्रसिद्ध करून आधार प्रमाणीकरणासाठी विशेष मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. पात्र–अपात्र शेतकऱ्यांच्या याद्यांचे पारदर्शक व्यवस्थापन. करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करण्यासाठी सर्व विभाग, बँक यांनी समन्वयाने काम सुरू केले आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची कामगिरी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने माहिती अपलोड करण्याच्या कामात मोठी आघाडी घेतली आहे. दि. २५ जून २०२६ अखेरच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील ९९.९६%पात्र सभासदांची माहिती पोर्टलवर यशस्वीरीत्या अपलोड करण्यात आली आहे. यात एकूण ५५हजार ९८१अपलोड करण्यात आली असून यात २५ जून अखेर एकूण ५६ हजार ०५ पात्र ठरले आहेत. केवळ १७ सभासदांची माहिती प्रलंबित आहे. गंगापूर आणि वैजापूर तालुक्यांनी १००% माहिती अपलोड केली आहे. इतर तालुक्यांमध्येही ९९.८७% ते ९९.९८% पर्यंत काम पूर्ण झाले आहे.

सभासद आधार विरहित असून, ५०० रुपयांच्या आतील कर्ज असलेल्या २१ सभासदांची स्वतंत्र नोंद करण्यात आली आहे. यातून शेतकऱ्यांसाठी जिल्हा प्रशासनाच्या या प्रभावी नियोजनामुळे कर्जमुक्तीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. उर्वरित अल्प कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, यामुळे पात्र शेतकऱ्यांना लवकरच कर्जमुक्तीचा मोठा दिलासा मिळणार आहे. जिल्हास्तरीय समितीच्या देखरेखीखाली आणि बँकेच्या गतीमान कार्यामुळे ही योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरणार आहे.

– डॉ. मीरा ढास, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर

# मादक पदार्थ व नाशिले पदार्थ जीवनाची राख-रांगोळी करतात- धोंडीरामसिंह राजपूत



वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – नशा आणणारे पदार्थ तसेच मादक पदार्थ व्यक्ती जीवनाची राख रांगोळी करतात अशा मादक व नशिल्या पदार्थांपासून युवा पिढीने दूर राहून याच्या दुष्परिणामा बाबत समाजात जनजागृती करावी असे आवाहन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी व समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत यांनी मादक पदार्थ विरोधी जनजागृती दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात येथील तंबाखू मुक्त पीएम श्री मौलाना आझाद विद्यालयात

नुकतेच केले.त्यांनी यासाठी विद्यार्थी, युवक व पालक वर्गाला व्यसनमुक्ती साठी प्रतिज्ञा दिली. तंबाखू,मादक द्रव्य कायमचे सोडून देण्याचे आवाहन केले.या प्रसंगी मुख्याध्यापिका नीता पाटील,शिक्षक बी.बी. जाधव, वैशाली पगारे, ज्योती दिवेकर, राजश्री बंड, पालक वर्ग, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ; मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

मुंबइ दि.२९ (प्रतिनिधी)- आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपल ब्ध करून दिल्या जाणार आहेत.

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

संत तुकाराम महाराजांनी 'तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा' या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किल ोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल ाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी आता ३० जूनची फायनल डेडलाईन, नियमभंग करणाऱ्यांवर १ जुलैपासून कडक कारवाई

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत असून त्यानंतर नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर १ जुलैपासून मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्वाची कामेही रोखण्यात येणार आहेत.

एचएसआरपी नंबर प्लेट न बसवणाऱ्या वाहनधारकांना वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, कर्जबोजा चढवणे किंवा उतरवणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल, तसेच परवाना नुतनीकरण यांसारख्या आरटीओमधील सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी ही अट लागू राहणार नाही. दरम्यान, ३० जूनपर्यंत एचएसआरपी बसवण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना १ जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे. राज्यात एचएसआरपी बसवण्याच्या कामासाठी तीन झोन निश्चित करण्यात आले असून झोन १ साठी रोझमेर्टा टेक्नॉलॉजीज लिमिटेड, झोन २ साठी रिअल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि झोन ३ साठी एफटीए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रा. लि. या कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृत दरही निश्चित केले आहेत. त्यानुसार दुचाकीसाठी ४५० रुपये, तीनचाकीसाठी ५०० रुपये, तर हलकी मोटार वाहने आणि मध्यम व अवजड व्यावसायिक वाहनांसाठी ७४५ रुपये (जीएसटी वगळून, फिटमेंट शुल्कासह) आकारण्यात येणार आहेत.

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० आणि मोटार वाहन अधिनियमातील कलम १७७ अन्वये पोलीस आणि परिवहन विभाग हे संयुक्त किंवा स्वतंत्रपणे ही कारवाई करणार आहेत. सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांनीही त्यांच्या ताब्यातील वाहनांवर ३० जूनपूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्याव्यात, असे आवाहन परिवहन विभागाचे सहआयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार ; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- केंद्र शासनातर्फे दरवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठित 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार - २०२६ साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बालकांना गौरवण्यासाठी केंद्र सरकारने पात्र बालकांकडून किंवा त्यांच्या वतीने संस्थांकडून नामनिर्देशन मागविले आहेत. यासाठी https://awards.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवणाऱ्या बालकांना प्रदान केला जातो.यात शौर्य,क्रीडा,समाजसेवा,विज्ञान आणि तंत्रज्ञान,पर्यावरण,कला आणि संस्कृती, नवोन्मेष याचा समावेश आहे.

अर्ज करण्यासाठी बालकाचे वय ५ वर्षांपेक्षा जास्त आणि ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी असावे. अर्ज केवळ https://awards.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जातील.

स्वत: बालक, पालक, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश प्रशासन, जिल्हाधिकारी, पंचायती राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था किंवा शैक्षणिक संस्था संबंधित बालकाचे नाव पुरस्कारासाठी सुचवू शकतात.

ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१ जुलै २०२६ ही आहे. जिल्ह्यातील ज्या बालकांनी शिक्षण, कला, क्रीडा किंवा सामाजिक कार्यात विशेष नैपुण्य मिळवले आहे, त्यांच्या पालकांना आणि संबंधित संस्थांना विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी संबंधितांनी वरील संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, कोमल कोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## (पान १ वरुन)

### नसरापूर अत्याचार प्रकरणात...

आरोपींना कायद्याचा धाक बसविण्यासाठी कठोर शिक्षा देण्यात यावी,' अशी विनंती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी युक्तिवादात केली होती. मिसर यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १२ महत्त्वपूर्ण निकालांचा संदर्भ दिला होता. बचाव पक्षाकडून ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी बाजू मांडली.

सरकार पक्षाने सादर केलेला डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, सीसीटीव्ही चित्रीकरण, परिस्थितीजन्य पुरावे, साक्षीदारांचे जबाब या बाबी विचार घेऊन आरोपीने केलेला गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. पीडित बालिकेच्या शरीरावर १८ गंभीर जखमा झाल्याचे आढळून आले होते. आरोपीने यापूर्वी दोन महिलांवर अत्याचार केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते.

आरोपी भीमराव कांबळे याच्यावर कलम १३७ (२), ६५ आणि ६५ (बलात्कार), १०३ (खून), ७४ (विनयभंग करण्याच्या उद्देशाने बळजबरी करणे), १४०, (१) यासह लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पोक्सो) कलम ४, ६, ८, १२ या कलमांन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले. या सर्व कलमांन्वये आरोप सिद्ध झाले आहेत.

महाराष्ट्रदिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आल्याच्या प्रकरणाचा निकाल हा राज्याच्या न्यायालयीन इतिहासात दोन महिन्यांत सुनावणी होऊन निकाली लागणारा पहिला खटला ठरला. तपासासाठी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक करण्यात आले. या पथकात सहा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी या प्रकरणाचा तपास केला. या खटल्यात सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, साक्षीदारांची साक्ष अशा विविध बाजूंनी तपास करून पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर १५ दिवसांत न्यायालयात १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रासह ५५ पेक्षा जास्त साक्षीदारांचा जबाब, परिस्थितीजन्य पुरावे, तसेच तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. विशेष न्यायालयात २१ मेपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी झाली. हे प्रकरण संवेदनशील असल्याने बंद दाराआड (इन कॅमेरा) सुनावणी झाली.

### शेतकऱ्यांच्या सरसकट...

सलील देशमुख, सुनील भुसारा यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री गिरीश महाजन साहेब यांनी फोनवर संपर्क साधला आणि उद्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अटीशर्ती काढण्याबाबतच्या बैठकीचं नियोजन करण्याचं आश्वासन दिलं. यापूर्वी त्यांनी पंढरपूरमध्ये दिलेला शब्द पाळला नसला तरी त्यांच्या पदाचा मान ठेवत पुन्हा एक वेळ त्यांच्यावर विश्वास ठेवून आंदोलनामुळं अडकलेले सामान्य नागरिक आणि सकाळपासून बंदोबस्तासाठी रस्त्यावर असलेल्या पोलिस बांधवांसाठी हे आंदोलन स्थगित केलं.

आता मंत्र्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे उद्या मुंबईत कर्जमाफीच्या अटीशर्ती काढण्याबाबतच्या बैठकीचं नियोजन होईल, अशी अपेक्षा आहे, अन्यथा पुन्हा एकदा विश्वासघात केला तर यापुढे कधीही त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. शिवाय राज्यात यापेक्षाही अधिक मोठं आंदोलन पुकारून शेतकऱ्यांची ताकदही सरकारला दाखवून देऊ असे रोहित पवार यावेळी म्हणाले.

### टीईटी पेपरफुटीची सीबीआय..

असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील ही परीक्षा असल्याने या प्रकरणाची नैतिक जबाबदारी शिक्षणमंत्र्यांनी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात वारंवार टीईटी, तलाठी, पोलीस भरती आणि इतर स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटत असल्याने हे संघटित रॅकेट असल्याचा आरोप करत नियम २८९ अंतर्गत सविस्तर चर्चा घेण्याची मागणी त्यांनी सभापतींकडे केली.

दरम्यान शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारच्या वतीने उत्तर देताना, टीईटी पेपरफुटीचा प्रकार पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे उघडकीस आल्याचे सांगितले.मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार एसआयटी स्थापन करण्यात आली असून, अनेक गुन्हे नोंदवून सखोल तपास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चौकशीत जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. भविष्यात परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक सुधारणा करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी सभागृहात दिली.

### आमचा खासदार पळालाय,...

आणि सबुरीचा तर पत्ताच नाही. यांना रोज नवीन बाप लागतो! जरा संयम ठेवला असता, तर उद्या येणारं सरकार आपलंच आहे. देवानेच उद्याच्या स्वच्छ सरकारमध्ये हे भ्रष्ट विचारांचे लोक नकोत म्हणून त्यांना ही दुर्बुद्धी दिली असावी, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.'' उद्धव ठाकरे म्हणाले की, ''त्या शहा सेनेच्या प्रमुखाला, गद्दाराला सुपारी दिली आहे. याला (देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून) गुंतवून ठेवा इथे. मी मंदिरात जाऊन आल्यानंतर ''काय प्रार्थना केली? काय प्रार्थना केली?'' विचारत होते. मी म्हटलं, ''मी प्रार्थना हीच केली की या देशावर आणि या राज्यावर जे संकट आलं आहे, हे संकट, हे अरिष्ट लवकर दूर कर. ही सगळी भ्रष्ट राजवट लवकरात लवकर गाडून टाक आणि पुन्हा एकदा माझ्या देशाला सुजलाम-सुफलाम आणि चांगले दिवस येवो, ही मी साई चरणी प्रार्थना केलेली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या खुर्चीचं रक्षण कर असेही बोललो.''

Truhome FINANCE

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनी:** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए** [नियम ८(६) ची तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि १४-०७-२०२६ रोजी स.११:०० ते दु १२:००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह) |
|---|---|---|---|---|
| **१. श्री. संतोष विठ्ठल दहिते (कर्जदार)<br>२. सौ. लता संतोष दहिते (सह-कर्जदार)<br>३. श्री. दुष्यंत संतोष दहिते (सह-कर्जदार)<br>सर्वांचा निवासी पत्ता :आर.एच. २७/१७, न्यू सुयोग हाऊसिंग सोसायटी, बजाज नगर, वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३११३६.<br>तसेच :फ्लॅट क्र. ४, गट क्र. ५२/१, सारा वेंकटेश, भोंडवे स्कूलजवळ, वाळूज, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३११३६.<br>तसेच : मालमत्तेचा पत्ता :फ्लॅट क्र. १२, तिसरा मजला, विंग क्र. १, सी-१, टाइप बिल्डिंग, सारा वेंकटेश, गट क्र. ५२/१, एम.आय.डी.सी. वाळूज, वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद – ४३११३६.<br>कर्ज खाते क्रमांक : SHLHAURD0000525 व STUHAURD0000934**<br>ताबा दिनांक व ताबा प्रकार **२२ नोव्हेंबर, २०२५ व प्रत्यक्ष ताबा**<br>ज्ञात अधिभार ज्ञात नाही | मागणी सूचना दिनांक : ०९-०५-२०२५ मागणी सूचना रक्कम :रु. १६,००,६११/- (फक्त सोळा लाख सहाशे अकरा रुपये) ही रक्कम दिनांक ०६-०५-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0000525 अंतर्गत देदेय आहे.रु. २,०४,०५३/- (फक्त दोन लाख चार हजार त्रेपन्न रुपये) ही रक्कम दिनांक ०६-०५-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. STUHAURD0000934 अंतर्गत देय आहे.वरील दोन्ही रकमा सदर मागणी सूचनेच्या प्राप्तीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, करारानुसार लागू होणाऱ्या पुढील व्याजासह अदा करणे आवश्यक आहे. | रु. १०,००,०००/- (फक्त दहा लाख रुपये).<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००./- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)**<br>रु. १,००,०००/- (फक्त एक लाख रुपये).<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १३ जुलै, २०२६ वेळ सकाळी १० ते सायं ५.००** | **१४ जुलै २०२६.<br>वेळ. सकाळी ११:०० ते १२:००** | **देबज्योती रॉय – ९८७४७०२०२१<br>सतीश बनसोड – ९७३००४७५७२<br>मयुरेश जाधव – ९८३३०१७२२१<br>अजय झांझोट – ९८२३३९०९९०<br>मालमत्ता पाहणी दिनांक : १२-०७-२०२६ वेळ : दुपारी १२:०० ते ३:००** |

**संपत्तीचे विवरण**

गट क्र. ५२/१, एम.आय.डी.सी. वाळूज, मौजे वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद येथे असलेल्या "सारा वेंकटेश" या इमारतीतील विंग क्र. १, सी-१ टाईप बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १२, कार्पेट क्षेत्रफळ ३२.५१ चौ. मीटर व बांधकाम क्षेत्रफळ ३०.२६ चौ. मीटर, यासह संबंधित सर्व हक्क व उपभोगाधिकार .चतु:सीमा :पूर्वेस : फ्लॅट क्र. ११, विंग क्र. १पश्चिमेस : बाजूची मोकळी जागा दक्षिणेस : बाजूची मोकळी जागा उत्तरेस : बाजूची मोकळी जागा

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दिनांक - ३०.०६.२०२६.

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक सन २०२६ चे कार्यक्रमाबाबत.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम - २०२६**
**निवडणूक कार्यक्रमाबाबत प्रसिद्धी सूचना**

ज्या अर्थी पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नियम १४ (२) अंतर्गत ०८ शहर पथविक्रेता समिती सदस्यांसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे. त्या अर्थी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथविक्रेत्यांना कळविण्यात येत आहे की महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) प्रवर्गातील पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेणेकरिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर निवडणूक खालील दर्शविलेल्या पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या ०८ (आठ) प्रवर्गासाठी घेण्यात येईल.

| अ.क. | प्रवर्ग | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | १ | महाराष्ट्र पथविक्रेता (उपनीविकेचे सरंक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) जागांसाठी |
| २ | अनुसूचित जमाती (महिला राखीव) | १ | |
| ३ | इतर मागासवर्ग (महिला राखीव) | १ | |
| ४ | अल्पसंख्यांक (सर्वसाधारण) | १ | |
| ५ | दिव्यांग व्यक्ती (सर्वसाधारण) | १ | |
| ६ | खुला प्रवर्ग (महिला राखीव) | १ | |
| ७ | खुला प्रवर्ग (सर्वसाधारण) | २ | |
| | **एकूण** | **८** | |

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम - २०२६**

| अ.क. | तपशील | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप करणे | बुधवार ०१/०७/२०२६ शनिवार ०४/०७/२०२६ | सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० | प्रकल्प विभाग , छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालय |
| २ | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे | सोमवार ०६/०७/२०२६ ते दि.११/०७/२०२६ शनिवार | सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० | |
| ३ | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करणे | सोमवार,१३/०७/२०२६ | सकाळी ११.०० ते छाननीपर्यंत | |
| ४ | नामनिर्देशन प्राप्त अर्जाची छाननी अंती अंतिम वैध्य उमेदवाराची प्राण यादी प्रसिद्ध करणे. | सोमवार, १३/०७/२०२६ | छाननी नंतर | |
| ५ | आक्षेप अर्ज स्वीकारणे | दि. १४/०७/२०२६ मंगळवार दि.१५/०७/२०२६ बुधवार | सकाळी ११.०० ते दपारी ३.०० | |
| ६ | नामनिर्देशन प्राप्त अर्जाची छाननी अंती अंतिम वैध्य उमेदवाराची प्रारुपा यादी प्रसिद्ध करणे. | १६/०७/२०२६ गुरुवार, | दुपारी ३.०० नंतर | |
| ७ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | १७/०७/२०२६शुक्रवार | सायंकाळी ५.०० पर्यंत | |
| ८ | नामनिर्देशन पत्र माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिद्ध करणे | १७/०७/२०२६शुक्रवार | सायंकाळी ५,०० नंतर | |
| ९ | मतदान दिनांक | सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत | | १. मनपा शाळा, भडकल गेट, (प्रभाग क्र. १ व २ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>२. मनपा शाळा, किराडपुरा, (प्रभाग क्र.३ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>३. मनपा शाळा, एन-७, सिडको, (प्रभाग क्र. ४ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>४. मनपा शाळा, मुकुंदवाडी (प्रभाग क्र. ५ व ६ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>५. प्रियदर्शनी मनपा शाळा, शहानुरमिया दर्गा, (प्रभाग क्र.७ व ८ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>६. मनपा शाळा, सिल्कमिल कॉलोनी, (प्रभाग क्र.९ व १० मधील पथविक्रेत्यांसाठी) |
| १० | मत मोजणी | रविवार, २६/०७/२०२६ | सकाळी ११.०० पासून | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालय |
| ११ | निवडणूक निकाल जाहीर करणे | रविवार, २६/०७/२०२६ | मतमोजणी नंतर | |

(दिनांक ०४ जुलै २०२६ शनिवार व दिनांक ११ जुलै २०२६ शनिवार रोजी निर्धारित वेळेत नामनिर्देशन पत्र स्विकारले जातील) या बाबतच्या सूचना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या https://chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी पथविक्रेत्यांच्या सर्व नोंदणीकृत सदस्यांनी उपरोक्त निवडणूक कार्यक्रमाची कृपया नोंद घ्यावी व निवडणूक कार्यक्रम पार पाडण्यास सहकार्य करावे.

**(अमोल येडगे)भा.प्र.से.**
आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.**
**दिनांक :- /०६/२०२६**